# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

E-mail - smcgados2@gmail.com

दि. 17 /03/2025, E- 232452

जा.क्र. नआ/वै/पदभरती-23/नि.आदेश/ म.बा./ अधि L-3/417

**वाचा :-** 1. क्र. प्रानिमं 1222/प्र.क्र.136/का.13-अ, दि.21/11/2022 रोजीचे शासन निर्णय

2. जा.क्र.नआ/वै/सरळसेवा पदभरती जाहीरात/340, दि.09/11/2023 ची जाहीरात

3. जा.क्र.नआ/वै/27 पोस्ट/गुण प्रसिध्दी /571,दि.28/03/2024 रोजीचे प्रसिध्दीपत्रक

4. मा. सेवकवर्ग निवड समिती दि.06/03/2025 रोजीचे इतिवृत्तांत.

### -: नियुक्ती आदेश :-

ज्याअर्थी सोलापूर महानगरपालिकेकडून वर्ग-अ (अराजपत्रित) ते वर्ग-ड मधील आस्थापनेवरील विविध 31 संवर्गामधून एकूण 302 पदे भरण्याबाबतची पदभरती जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती, व त्या अनुषंगाने ऑनलाईन परीक्षा घेवून सामाजिक व समांतर आरक्षणानुसार गुण प्रसिध्द करून दस्तऐवज पडताळणी, वैद्यकिय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणीचे अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपात निवड व प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

ज्याअर्थी निवडीत उमेदवारांची दस्तऐवजाची तपासणी होवून त्याबाबतचा अंतिम निर्णय संदर्भ क्र.4 ने सेवकवर्ग निवड समितीमध्ये घेण्यात आलेला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.4 चे निर्णयानुसार खालील तक्त्यात नमूद उमेदवारांची **महिला व बालकल्याण विभागा** कडे रिक्त असलेल्या **"महिला व बाल विकास अधिकारी "** या पदी **दिनांक** 18 /03/2025 पासून प्रथम दोन वर्षे परिविक्षा कालावधीकरीता सातवे वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी S-15, वेतन बँड-41800-132300 मधील मनपाचे दि.10/07/2023 रोजीचे परिपत्रकानुसार र.रू.41800/- यावर दोन वर्षाकरीता तद्नंतर सदर पदाचे इतर मान्य भत्ते यावर खालील शर्ती व अटीवर नियुक्ती करणेत येत आहे.

| अनु क्र. | उमेदवारांचे नांव | मूळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | सातवे वेतन आयोगातील एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | ASHOK DNYANDEO KARWAR | Nomadic Tribe - C (NT - C) | WL OPEN - GEN | र.रू.41800/- प्रति माह. |

अटी /शर्ती :-

1. उमेदवारांना दिलेली नेमणूक ही पूर्णतः तात्पुरत्या अस्थायी स्वरुपाची व दोन वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीसाठी असून नियुक्त पदासाठीची अर्हता व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यतेच्या अधिन राहून निवड करण्यात आलेली आहे. सदर कागदपत्रे /प्रमाणपत्रे बनावट, खोटे असल्याचे या पुढे केव्हाही आढळून आल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याचे नियुक्ती प्राधिका-याचे अधिकार अबाधित राहतील. तसेच दोन वर्षाचा परिविक्षाकालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्याबाबतचे कार्यवाईचे सर्वाधिकार नियुक्ती प्राधिकारी राखून ठेवत आहे.

2. नियुक्त उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या पदावर सदर आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसांचे आत स्वखर्चाने हजर होणे आवश्यक आहे. त्यांची जेष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली 2021 मधील तरतूदीनुसार राहील व जे उमेदवार विहीत मुदतीत नियुक्त पदावर हजर होणार नाहीत ते त्यांची एकत्रित निवडसूचीतील जेष्ठता गमावणेस पात्र राहतील.

3. उपरोक्त नियुक्त कर्मचाऱ्यांनी मेडिकल बोर्ड सोलापूर महानगरपालिका यांचे काम करणेस शारिरीक दृष्टया कामकरणेस पात्र असलेबाबतचे प्रमाणपत्र रुजू झाल्यानंतर 1 महिनेच्या आत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. शारीरिक तपासणीत अपात्र उमेदवाराची नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

4. शासन निर्णय मधील तरतूदीनुसार, ज्या उमेदवाराची निवड अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विमुक्त भटक्या जाती, जमाती (अ,ब,क,ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे अशा उमेदवारांची नियुक्ती ही सक्षम प्राधिका-याकडून जातीचे प्रमाणपत्र पडताळणीस अधिन राहून असेल. अशा प्रवर्गानुसार नियुक्त उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत, जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करून ती सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील. त्याकामी आवश्यक विहीत कागदपत्रासह प्रस्ताव उमेदवाराने कार्यालय प्रमुख यांचेकडे 1 महिन्याच्या मुदतीत सादर करावा. जर उमेदवाराने विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर, त्यांची सेवा समाप्त करणेत येईल. तसेच ज्या उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडून अवैध ठरविणेत येईल, त्या उमेदवाराचे नियुक्ती महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी- 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, 12 डिसेंबर 2011 मधील तरतुदीनुसार आदेश तात्काळ रद्द करणेत येतील व त्यांना सेवेतून कमी करणेत येईल. त्याकरीता कोणतीही पूर्वसूचना दिली जाणार नाही. तसेच संबंधीत उमेदवारा विरुध्द नियमानुसार कारवाई करणेत येईल.

5. खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारास त्यांच्या मूळ जातीच्या प्रवर्गाचा फायदा सेवा ज्येष्ठता/पदोन्नतीकरिता घ्यावयाचा असल्यास सदर उमेदवारांनी नियुक्तीपासून 6 महिन्याच्या आत मूळ जातीचे वैधता प्रमाणपत्र संबंधीत कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

6. वरील उमेदवारांची नियुक्ती ही त्यांचे पूर्वचारित्र्य, वर्तणूक अहवालाचे अधिन राहून करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडील परिपत्रक क्र. व्हिसीए-1060 डी दिनांक 27/9/1960 नुसार उमेदवार यांचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य बाबतचा अहवाल समाधानकारक असल्याचे आढळून आले नाही तर सा.प्रविभागाकडील शासन निर्णय क्र. चापअ 1012/प्र.क्र.63/16अ दि.26/8/2014 नुसार कारवाई करून त्यांची सेवा पूर्व सूचना न देता तात्काळ संपूष्टात आणली जाईल.

7. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक आरटीआर-1403/84/प्र.क्र.54/03/13 दिनांक 10/5/2005, मधील तरतूदीनुसार गट क मधील पदावर नियुक्तीचे दिनांकापासून 2 वर्षाचे आत शासनाने वेळोवेळी विहीत केलेली संगणक अर्हता धारण करणे बंधनकारक आहे. त्यानुसार सदर आदेशातील नमूद उमेदवारांनी नियुक्ती पासून 2 वर्षाच्या आत विहीत संगणक अर्हता धारण केलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणेच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. विहीत मुदतीत अर्हता धारण न केल्यास संबंधीत उमेदवारांस कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून तात्काळ कमी केले जाईल.

8. नियुक्त केलेल्या उमेदवारांनी शासकीय नियमानुसार हिंदी, मराठी भाषा जर पुर्वी उत्तीर्ण केली नसल्यास किंवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आलेली नसेल तर त्याने / तिने सदर परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.निम्नस्तर परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता 2 वर्षे मुदत देण्यात आलेली आहे.सदर परीक्षा उत्तीर्ण झालेवर उच्चस्तरीय परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता 2 वर्षाची मुदत देण्यात आलेली आहे.विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास, उक्त कालावधी समाप्त झालेनंतर,अशी एक किंवा यथास्थिती दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात येईपर्यंत त्यांच्या वेतनवाढी रोखण्यात येतील.

9. सोलापूर महानगरपालिके कडील उक्त नमुद पदावरील सेवेच्या शर्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व त्या अनुषगांने असणारे आदेश नियम व त्या वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्ती या सोलापूर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2022 च्या अधिन राहून लागू राहतील.

10. माजी सैनिक,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त,अंशकालीन व दिव्यांग या समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही आरक्षणाकरिता उमेदवाराने सादर केलेल्या समांतर आरक्षणाबाबतच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून असेल.सदर पडताळणीत उमेदवार अपात्र झाल्यास त्याची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

11. इतर मागास वर्ग,सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती,भटक्या जाती,जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 31/01/2020 मधील तरतुदीनुसार,खुल्या प्रवर्गातील, महिला, वि.जा.,भ.ज.,इ.मा.व, व वि.मा.प्रवर्गातील व्यक्ती, शैक्षिणिक व सामाजीकदृष्ट्या मागास प्रवर्ग आणि या प्रवर्गात समाविष्ट मराठा समाज आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्ग या प्रवर्गातील प्रगत व उन्नत गटात समाविष्ट नसलेल्या व्यक्तींना सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या **Non Creamy Layer** प्रमाणपत्राच्या पडताळणीचे अधिन राहून नियुक्ती असेल. सदर पडताळणीस उमेदवार अपात्र झाल्यास त्याची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

12. अनाथ या समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही महिला व बालविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 02/04/2018 मधील तरतुदीनुसार,अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी अहवालाचे अधिन राहून देण्यात येत आहे. सदर तपासणीस उमेदवार अपात्र झाल्यास त्याची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

13. खेळाडू या समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 30/06/2022 मधील तरतुदीनुसार खेळाडू उमेदवारांची क्रिडा प्रमाणपत्रे मा.आयुक्त,क्रिडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून पुर्नपडताळणीच्या निर्णयास अधिन राहून असेल.

14. सोलापूर महानगरपालिकेमध्ये उमेदवार सेवेत रुजू झालेपासून कमीत कमी 5 वर्षे सेवा झाले शिवाय अन्य विभागामध्ये सेवा समावेशन करणेबाबत उमेदवारांना अर्ज करता येणार नाही .

15. शासन निर्णयातील तरतुदीनुसार दोन महिन्यांच्या आत मत्ता व दायित्व (Assets & Liabilities) बाबतची पत्र / विवरणपत्र कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. विवरणपत्र विहीत मुदतीत सादर न केल्यास सदर कर्मचा-याविरूध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियमांतर्गत शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल.

16. सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सदर नियुक्तीचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात / मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्याय प्राधिकरणाकडे अथवा अन्य सक्षम न्यायालयात दावा दाखल असल्यास अथवा करण्यात आल्यास त्या दाव्याच्या अंतिम निर्णयास सदर नियुक्ती बंधनकारक राहील.

17. उपरोक्त नियुक्त कर्मचाऱ्यास शासन निर्णय क्र.अंनियो-105/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 व शासन निर्णय क्र.अंनियो-2012/प्र.क्र.96/सेवा-4, दिनांक 27/08/2014 मधील तरतूदीनुसार राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (National Pension System) योजना लागू राहिल. याशिवाय शासनाकडून याबाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय लागू राहतील.

18. नियुक्ती पदावर हजर होताना शासन निर्णय दि.1 जुलै 2005 नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील तरतूदीनुसार उमेदवारास लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबत भविष्यात माहिती खोटी/चुकीची आढळून आलेस संबंधीतांना शासकीय सेवेतून तात्काळ कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकणेत येईल .

19. विभागीय परिक्षा लागू असणाऱ्या पदावरील नियुक्त उमेदवारांनी परिविक्षा कालावधीत सोलापूर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2022 नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनाकांपासून 4 वर्षांत 3 संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

20. उपरोक्त नियुक्ती आदेशातील सर्व व शर्ती मान्य असलेबाबत रक्कम रुपये 100/- च्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञालेख रुजू होणेपूर्वी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.

21. उपरोक्त नियुक्ती आदेशातील सर्व नियुक्त उमेदवरांनी सामान्य प्रशासन विभागाकडे रूजू व्हावे. तसेच रूजू होताना रूजू अहवालासोबत सर्व मूळ कागदपत्रे व त्यांचा छायांकित प्रतीचा एक संच सादर करावा.

22. **ज्या उमेदवारांना महानगरपालिकेची नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी दोन महिन्यांची पूर्व नोटीस देणे आवश्यक राहिल अथवा दोन महिन्यांच्या मूळ वेतना इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक राहिल.**

( डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से. )
आयुक्त ,
सोलापूर महानगरपालिका,

**प्रती,**

**संबधित सेवक**

**प्रत :-**

1. मुख्य लेखापाल कार्यालय
2. संबंधित विभाग
3. संगणक विभाग
4. सेवापुस्तक विभाग / आस्था-7, सा.प्र.वि.
5. अंतर्गत लेखापरिक्षक
6. आरोग्य विभाग
7. स्थळप्रत